


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २३२ वा शनिवार दि ०८ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# तो कॉल आला अन् खडसेंनी पद सोडलं; गिरीश महाजनांचा राजीनाम्याबद्दल मोठा गौप्यस्फोट....

वृत्तसंस्था/ जळगाव

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील सरकारी जमिनीबाबत राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी केलेला गैरव्यवहार समोर आल्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार एकनाथ खडसे यांच्याशी संबंधित भोसरी भूखंड प्रकरणही चर्चेत आले आहे. भोसरी प्रकरणावरून टीका झाल्यानंतर एकनाथ खडसे यांना आपलं मंत्रिपद गमवावं लागलं होतं. खडसे यांच्या राजीनाम्याविषयी आता भाजप नेते आणि राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. खडसेंनी भाजपमध्ये असताना मंत्रिपदाचा राजीनामा नैतिकतेमुळे दिला नव्हता. दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडून त्यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले होते. अन्यथा पक्षातून हकालपट्टीची धमकी देण्यात आली होती, असा दावा महाजन यांनी केला आहे. गिरीश महाजन म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते (शरद पवार गट) एकनाथ खडसे यांनी भाजपमध्ये असताना मंत्रिपदाचा दिलेला राजीनामा हा नैतिकतेच्या आधारावर नव्हता, तर राजीनामा द्या, नाहीतर पक्षातून हकालपट्टी करू,फ असा स्पष्ट निरोप त्यांना दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या





पार्श्वभूमीवर गिरीश महाजन यांनी शुक्रवारी जळगाव इथं भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. जळगाव हा भाजप व महायुतीचा बालेकिल्ला असून, सर्व कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश दिल्याचं महाजन यांनी सांगितलं. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना, गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसेंबाबत गौप्यस्फोट केला. गिरीश महाजन म्हणाले, कसली नैतिकता? त्यांचा राजीनामा नैतिकतेच्या आधारावर नव्हता. माझ्यासमोरचा हा विषय आहे. जेव्हा त्यांचे प्रकरण (भोसरी भूखंड) उघडकीस आले, तेव्हा त्यांना थेट दिल्लीहून सूचना देण्यात आल्या होत्या. महाजन यांनी पुढे दावा केला की, खडसेंना पक्षाकडून स्पष्ट अल्टिमेटम देण्यात आला होता. खडसे यांना स्पष्ट सांगण्यात आलं होतं की, तुम्ही राजीनामा द्या, नाहीतर तुमची पक्षातून हकालपट्टी करण्यात येईल.

## राजस्थानात बैल आणण्यासाठी गेलेल्या शिरपूरच्या भारत शेळकेंचा अपघातात मृत्यू! दोन जखमी

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील शिरपूर गावावर शोककळा पसरली आहे. राजस्थान येथे बैल खरेदीसाठी गेलेल्या तिघांवर परतीच्या प्रवासात भीषण अपघाताचा कहर ओढवला. या अपघातात भारत प्रकाश शेळके (वय ३५) यांचा जागीच मृत्यू झाला असून, राजेंद्र बाहेकर व आणखी एक जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हे तिघेजण राजस्थानला बैल आणून परत येत असताना महामार्गावर त्यांनी वाहन थांबवून लघवी करण्याकरिता रस्त्याच्या कडेला उतरले. त्याच वेळी मागून येणाऱ्या एका वेगवान वाहनाने जबर धडक दिल्याने तिघेही रस्त्यावर फेकले गेले.



स्थानिकांनी तात्काळ बचावकार्य सुरू करून जखमींना रुग्णालयात दाखल केले, मात्र भारत शेळके यांना वाचवणे शक्य झाले नाही. या दुर्दैवी घटनेने शिरपूर गावात हळहळ व्यक्त केली जात असून, मृताच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. राजस्थान पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, अपघातग्रस्त वाहन चालक फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## १४ एकर शेती प्रकरणात राजेंद्र प्रभाकर तारे यांचा स्फोट!



जनसंचलन/बुलढाणा

डोंगर खंडाळा १४ एकर शेतीप्रकरणावरून तापलेल्या वादाला नवी कलाटणी मिळाली आहे. काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत राजेंद्र प्रभाकर तारे यांनी मीडिया समोर थेट सांगितले की,आमच्या वाट्याची १४ एकर जमीन बळकावण्याचा डाव राहुल तारे यांनी आखला होता. त्यांनी स्पष्ट केले की,२८ एकर शेतीपैकी १४ एकर जमीन त्यांच्या वाट्याची होती आणि ती जमीन त्यांनी कायदेशीर पद्धतीने महेंद्र राऊत यांना विकली आहे.राजेंद्र प्रभाकर तारे यांनी सांगितले की, या प्रकरणात ओएसडी भंडारे यांचे नाव विनाकारण खेचले जात असून त्यांचा या व्यवहाराशी काहीही संबंध नाही. आम्ही वयोवृद्ध असल्याने आम्हाला पुणे ते बुलडाणा प्रवास होत नसल्याने ती जमीन विकणे हा आमचा हक्क आहे.आमच्या वाट्याची जमीन आम्ही विकली, त्यात गैर काय? असा थेट सवाल राजेंद्र प्रभाकर तारे सह इतर यांनी मीडिया समोर उपस्थित केला

# क्रिप्टोचा घातक शिरकाव

## संपादकीय लेख

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारून सहा महिने होताहेत तोच नानाविध पद्धतींनी त्यांनी अनेक प्रस्थापित आराखडे, संकल्पना तोडूनमोडून टाकल्या आहेत. त्यात आयात शुल्काचे युद्ध, जागतिक रखवालदाराच्या भूमिकेतून घेतलेली माघार, मित्रराष्ट्रांचा उघड अपमान किंवा हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मारलेली कोलांटउडी अशा अनेक गोष्टींचा समावेश होईल. यामुळे ट्रम्प यांची क्रिप्टोकरन्सीच्या क्षेत्रातील घोडदौड काहीशी दुर्लक्षिली जात आहे. मात्र, क्रिप्टोच्या माध्यमातून ट्रम्प कुटुंबीयांनी अत्यल्प कालावधीत जमवलेली माया आणि त्यासाठी गेल्या सहा महिन्यात अमेरिकेची यासंदर्भातली बदलण्यात आलेली धोरणे ही चिंतेची गोष्ट आहे. या आधीच्या कार्यकाळात ट्रम्प यांनी क्रिप्टोकरन्सीला ङ्गमहाघोटाळाफ म्हणून संबोधले होते; परंतु आता त्यांनी त्या घोटाळ्याचे महानायक बनण्याचे ठरवले की काय, अशी शंका येते. गेल्या वर्षी त्यांच्या कुटुंबीयांनी ङ्गवर्ल्ड लिबर्टी फायनान्शियलफ नावाची कंपनी काही संशयास्पद व्यक्तींच्या मदतीने स्थापन केली. त्यामार्फत सारखे ङ्ग मीम कॉईन म बाजारात आणून, त्याची भरपूर जाहिरात करून गुंतवणूकदारांना ट्रम्प यांना प्रत्यक्ष भेटण्याचा, सोबत भोजनाचा मान देण्यात आला. याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे, ट्रम्प यांच्या या क्रिप्टोकरन्सी संलग्नतांमुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात विदेशी शक्तींचा हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर पाकिस्तानला भारताने दिले, तेव्हा युद्धविरामानंतर ट्रम्प यांच्या फर्मने पाकिस्तान क्रिप्टो कौन्सिलशी भागीदारी केली, ज्यामध्ये उच्चपदस्थ पाकिस्तानी अधिकारी आणि लष्करी नेतृत्वाचाही समावेश होता. बदल्यात पाकिस्तानी लष्करप्रमुखाला थेट व्हाइट हाऊसफमध्ये भोजनासाठी निमंत्रित करण्यात आले. जेव्हा अमेरिकेसारख्या देशाचे राजकीय नेतृत्व अशा अपारंपरिक आर्थिक साधनांमध्ये थेट हितसंबंध ठेवते, तेव्हा ङ्गक्रिप्टो-प्रेरित राजकारणफ उदयाला येऊ शकते, आणि ते भू-राजकीय स्थैर्यालाही आव्हान देऊ शकते. अमेरिकेत अर्थातच यावरून मोठा वादंग निर्माण झाला आहे. डिजिटल मालमत्तेला अनुकूल कायदे मंजूर करणे, गृहकर्जासाठी राखीव मालमत्ता म्हणून मान्यता देणे किंवा अमेरिकन नागरिकांच्या निवृत्तीवेतनाच्या पोर्टफोलिओमध्ये त्यांचा समावेश करणे, तसेच आर्थिक नियमकांवर अनुकूल व्यक्तींची नेमणूक करून संशयित गुन्हेगारांविरुद्ध सुरू असलेल्या शोधमोहिमा थांबवणे यासारख्या अध्यक्षांच्या कृती वैयक्तिक आर्थिक लाभ मिळवण्यासाठीच्या आहेत, असा आरोप केला जात आहे. राष्ट्राध्यक्षांसारख्या उच्च पदावर असलेल्या व्यक्तीने, आपल्या अधिकाराचा वापर करून स्वतःच्या हिताची धोरणे आखणे, हे सार्वजनिक विश्वासाचा भंग करणारे कृत्य होय. एखाद्या राष्ट्राध्यक्षाने तेल उद्योगात स्वतःची प्रचंड गुंतवणूक असताना, तेल कंपन्यांना थेट फायदा होईल असे कायदे केले असते, तर समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटली असती; मात्र, क्रिप्टो करन्सीच्या अपारदर्शक स्वरूपामुळे, या कृतींना आर्थिक प्रगतीफच्या नावाखाली झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. आज अनेक जण या नव्या तंत्रज्ञानाकडे एक आर्थिक क्रांती म्हणून पाहत आहेत, मात्र त्यातील संभाव्य धोके प्रचंड आणि चिंताजनक आहेत. विशेषतः क्रिप्टोकरन्सी हे अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, दहशतवादी आणि संघटित गुन्हेगारीसाठी मनी लाँडरिंगचे एक प्रमुख साधन बनले आहे. बेकायदा आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांसाठी डिजिटल मालमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ट्रम्प प्रशासनाने मात्र अशा गैरव्यवहारांना आळा



घालण्याऐवजी, क्रिप्टोकरन्सीला अधिकाधिक वापरकर्ते कसे मिळतील त्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. बेकायदा उद्योगांना लपवण्यासाठी क्रिप्टोकरन्सी अधिकाधिक उपयुक्त बनत जाणार. अशा धोरणांमुळे आर्थिक प्रणाली अस्थिर होऊन सट्टेबाजीचे बुडबुडे निर्माण होऊ शकतात, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला आहे. आर्थिक प्रणालींमधील अतिशिथिलता आणि त्यात गुंतलेले हितसंबंध या जोडगोळीमुळे २००८ मध्ये आधी अमेरिकेची आणि त्यामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था संकटात सापडली होती. आज पुन्हा त्याच धोक्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या वैयक्तिक गुंतवणुकी, नियामक हस्तक्षेप आणि अपारदर्शक विदेशी संस्थांशी वाढते संबंध यामुळे डिजिटल मालमत्ता ही अमेरिकेच्या भविष्यातील आर्थिक अस्थिरतेचे कारण बनू शकते, आणि ते पूर्ण जगाचे अर्थकारण दूषित करून टाकू शकते. कठोर नियम आणि पारदर्शकतेअभावी, अनियंत्रित डिजिटल चलनांचा आणि अनिर्बंध राजकीय सत्तेचा संगम हा भ्रष्टाचार, भांडवलाची पळवापळवी आणि भू-राजकीय हेराफेरीला पोषक ठरू शकतो.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राजीनाम्याचा उल्लेख 'पार्थ पवारांवर गुन्हा का नाही?' अंबादास दानवेंचा प्रश्न



**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी थोड्यावेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी यावेळी पार्थ पवार यांच्या कंपनीने पुणे कोरेगाव पार्कमध्ये खरेदी केलेली जमीन ही सरकारी जमीन असल्याने व ती विकताच येत नाही असे म्हटले आहे. तरी ज्यांनी हा व्यवहार केला त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत असं म्हटलं आहे. त्याचवेळी हा संपूर्ण व्यवहारही रद्द केला असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, कालपासून अजित पवार यांना या जमीन व्यवहारावरुन टार्गे ट करण्यात येत होतं. राज्याचे विरोधी पक्षातील नेते व सामाजिक कार्यकर्ते उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राजीनाम्याचीच मागणी करताना दिसत होते. शिवसेना ठाकरे गटाने अजित पवारांना पार्थ पवारांच्या या प्रकरणावरुन घेरलं होतं. त्यानंतर आता अजित पवारांच्या या पत्रकार परिषदेनंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते व माजी विरोधीपक्षनेते अंबादास दानवेंनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी त्यांनी अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा एकदा केली आहे. त्याचवेळी त्यांनी या प्रकरणावर काही प्रश्नही उपस्थित केले आहेत.या प्रकरणात माझा एक प्रश्न आहे की एखाद्याने चोरी केली. पोलिसांनी चोरीचा ऐवज जप्त केला तर गुन्हा रद्द होतो का? चोरी मान्य केल्याने गुन्हा माफ होत नाही असं अंबादास दानवे म्हणाले आहेत. ते पुढे म्हणाले कंपनीमध्ये ज्याचा एक टक्का शेअर आहे त्याच्यावर गुन्हा दाखल होतो. ज्याचा नव्वद टक्के शेअर आहे त्याच्यावर नाही. ठीक आहे तर मग या कंपनीवर गुन्हा दाखल करावा, या कंपनीकडे ३०० कोटी रुपये कुठुन आले? याचीही चौकशी झाली पाहिजे. ४० एकर सरकारी जमीन कशी विकता आली? जर हे प्रकरण उघडकीस आलं नसतं तर जमीन पचवली असती ना. तेव्हा ही जमीन पार्थ पवारांनी एक टक्का शेअरवाल्याला दिली असती का? असा प्रश्न दानवेंनी उपस्थित केला आहे.

राज्य सरकार बनवाबनवी, फसवेगिरी करत आहे. यामध्ये पार्थ पवारांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. व या प्रकरणात अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी भूमिका यावेळी अंबादास दानवेंनी मांडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भ्रष्टाचाराविरोधात फक्त बोलतात. परंतू भ्रष्टाचाराने बरबटलेले महाराष्ट्र सरकार आहे असाही घणाघात यावेळी दानवेंनी केला आहे.

## पार्थ पवारांवर गुन्हा दाखल का केला नाही?

मुंबई : अजित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेत पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने केलेल्या वादग्रस्त जमीन प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. संबंधित जमीन व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती अजित पवारांनी आपल्या पत्रकार परिषदेत दिली.

या प्रकरणातील जे डॉक्यमेंट झाले होते ते सर्व कॅन्सल करण्यात आल्याचं अजित पवार पत्रकार परिषदेत म्हणाले. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या निमित्ताने आढावा बैठका घेतल्या होत्या. त्यावेळेस मी आढावा बैठका संपल्यानंतर गेल्या दोन दिवसांपूर्वी ज्या चर्चा सुरु आहेत त्याची पूर्ण माहिती घेऊन त्यावर बोलेन आणि माझी भूमिका स्पष्ट करेन', असं अजित पवार सुरुवातीला म्हणाले.मी आजपर्यंतच्या माझ्या ३५ वर्षांच्या राजकीय जीवनात कधी नियम सोडून काम केलेलं नाही. मागे माझ्यावर २००९-२०१० मध्ये आरोप झाले. पण त्याचे कुठेही पुरावे निघाले नाहीत. त्याचे श्वेतपत्रिका निघाले आहेत. पण मधूनआधून त्यावरुन कमेंट करुन मला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो', असं अजित पवार म्हणाले.

## अजित पवार यांनी राजीनामा द्यावा

**नागपूर :** पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमीन घोटाळ्याच्या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विधीमंडळातील काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

शुक्रवारी नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, एखाद प्रकरण झाले, ते अंगलट आले की उपमुख्यमंत्री अजित पवार हात झटकतात. आता तर पुण्यातील जमिनीचे प्रकरण आहे, त्यांच्या मुलाने व्यवहार केला आहे, प्रकरण वाढल्यावर माझा याच्याशी संबंध नाही असे बोलून उपमुख्यमंत्री अजित पवार जबाबदारी झटकू शकत नाही, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली. पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरणी अमेडिया कंपनीने व्यवहार केला. या कंपनीत पार्थ पवार पार्टनर आहेत, त्यांच्या सह्या आहेत. मग गुन्हा फक्त दिग्विजय पाटील वर का दाखल झाला?

पुणे जमीन घोटाळाप्रकरणी आता सांगण्यात येत आहे की, दिग्विजय पाटील याला व्यवहार करण्यासाठी अधिकार देण्यात आले होते,पण व्यवहार करायला पैसे आले कुठून? व्यवहार कुणामुळे झाला? कुणामुळे स्टॅम्प ड्युटी माफ झाली? पार्थ पवार यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्यामुळे या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली पाहिजे. या प्रकरणाशी सबंधित महसूल विभागाचे अधिकारी,उद्योग संचानालय, शीतल तेजवानी सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

## ठाकरे आणि शिंदे शिवसेना एकत्र येणार? तळकोकणात गुप्त बैठक

**सिंधुदुर्ग :** राज्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत टोकदार राजकीय संघर्ष होत असताना कोकणात मात्र नाट्यमय घडामोडी घडत आहेत. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची कणकवलीत एकत्रित बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावरच तळकोणाच्या राजकारणात भूकंप होण्याची शक्यता आहे. तळकोकणात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने स्वबळाचा नारा दिल्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेने मोठी खेळी करण्याचा प्रयत्न केला आहे.



उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे कणकवलीतील माजी नगराध्यक्ष संदेश पारकर यांना पाठिंबा जाहीर करण्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी समीर नलावडे यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. मात्र याविरोधात आता शिवसेनेच्या शिंदे गटाकडून नवी राजकीय खेळी खेळली जाण्याची शक्यता आहे. कणकवली नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी कणकवली शहर विकास आघाडीच्या माध्यमातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आणि शिंदेंच्या शिवसेनेची एकत्रितरित्या बैठक झाल्याची माहिती आहे. या दोन्ही शिवसेना एकत्र आल्यास महाराष्ट्राच्या राजकारणातील एक नवीन व अनोखं उदाहरण हे तळकोकणात पाहायला मिळू शकतं. सिंधुदुर्गातील या राजकीय घडामोडींची राज्यभर चर्चा सुरू झाल्यानंतर ठाकरेंच्या पक्षातून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेले माजी आमदार राजन तेली यांनी सांगितलं की, 'कणकवली शहर विकासासाठी केवळ ठाकरे गट नाही तर समाजसेवा करणारी सगळी मंडळी एकत्र येण्याचा प्रस्ताव आहे. मात्र या विषयावर अद्यापही कोणता निर्णय झालेला नाही.

# मनोज जरांगेंना संपवण्याचा कट, प्रत्यक्ष धनंजय मुंडे आणि आरोपी यांच्यातील संभाषणाच्या कथित..

**मुंबई :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेत याबाबतचे पुरावे दाखवण्याचा प्रयत्न केला. मनोज जरांगे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत माजी मंत्री धनंजय मुंडे यांचं थेट नाव घेतलं. त्यांनी धनंजय मुंडे आणि एका आरोपीच्या फोनवरील संभाषणाची एक कथित ऑडिओ क्लिप दाखवली. यामध्ये आरोपी धनंजय मुंडे यांच्याकडे गाडी मागताना दिसत आहे. तर ही गाडी आपल्या ताफ्यात टाकून आपल्या जीवावर घालण्याचा बेत होता, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मनोज जरांगे यांनी ऐकवलेली ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे. पण 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन' या कथित ऑडिओची पुष्टी करत नाही. ऑडिओ क्लिपमधील संभाषणाची सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेत याबाबतचे पुरावे दाखवण्याचा प्रयत्न केला. मनोज जरांगे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत माजी मंत्री धनंजय मुंडे यांचं थेट नाव घेतलं. त्यांनी धनंजय मुंडे आणि एका आरोपीच्या फोनवरील संभाषणाची एक कथित ऑडिओ क्लिप दाखवली. यामध्ये आरोपी धनंजय मुंडे



यांच्याकडे गाडी मागताना दिसत आहे. तर ही गाडी आपल्या ताफ्यात टाकून आपल्या जीवावर घालण्याचा बेत होता, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मनोज जरांगे यांनी ऐकवलेली ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे. पण 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन' या कथित ऑडिओची पुष्टी करत नाही. ऑडिओ क्लिपमधील संभाषणाची सविस्तर माहिती जाणून घेऊयात.त्याला आमच्या ताफ्यात गाडी द्यायची आहे. मग तो आम च्या अंगावर गाडी घालणार, असा तो प्रकार आहे. धन्याला आणखी सांगतो. तू जसेजसे प्रश्न करणार, तसे तुला उत्तर मिळत जाणार. तुझं म्हणणं आहे ना, हे खोटं असेल. तर सीडीआर काढा. कोण कुणत्या ठिकाणी, कोण कुणाला भेटलं? ते पोरं आता अटकेत आहेत. त्यावेळेस त्यांचं लोकेशन कुठे होतं ते काढा. हे आता मी सुद्धा मागे पडू देणार नाही. या प्रकरणात प्रमुख सूत्रधार हाच आहे. मी सीबीआय, ब्रेन मॅपिंग आणि नार्को टेस्टला तयार आहे', असं मनोज जरांगे पाटील पत्रकार परिषदेत म्हणाले.

# माझ्या नवऱ्याला महिन्याभरापासून दारु पाजून हा प्लॅन, आणि...'

## मनोज जरांगे प्रकरणात आरोपी अमोल खुनेच्या बायकोचा दावा..



**बीड :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना मारण्याची सुपारी देण्यात आली असल्याचा धक्कादायक प्रकार सम ोर आलेला आहे. या प्रकारातील आरोपी अमोल खुने हा जरांगेंच्या जवळचा जुना सहकारी असल्याचं समोर आलेलं आहे. याच पार्श्वभूमीवर अमोल खुनेची पत्नी आणि आईने मोठा खळबळजनक दावा केला आहे. त्या म्हणाल्या की, 'मनोज जरांगे पाटील व त्यांचे लोक मागील एक महिन्यापासून माझ्या पतीला दारू पाजत होते. त्या नशेमध्ये त्यांच्याकडून हे सगळं करून घेतलं जात होतं', असा धक्कादायक दावा अमोल खुनेच्या पत्नीने केला आहे.माझे पती मराठा आंदोलक जरांगे पाटलांचे सुरुवातीपासून कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये व स्टेटसला नेहमी जरांगे पाटलांचे फोटो असतात. ते जरांगे पाटलांना देव मानतात. माझ्या पतीला या प्रकरणात अडकवलं जातंय. त्यांचा काहीही संबंध नाही', असंही आरोपी अमोल खुणे याची पत्नी आणि आईने म्हटलं आहे. तसेच 'माझ्या पतीने व आम्ही जरांगे पाटलांसाठी याआधीही जेल भोगलेले आहे, आता पुन्हा आम्हाला अडकवले जात आहे', असा आरोपही त्यांनी केला आहे.गोरगरीब मराठा समाज बांधव यांच्या न्याय हक्कासाठी राज्यभरात लढा उभा करणारे योद्धा म्हणजे मनोज जरांगे पाटील . मागील तीन वर्षांपासून घराघरात पोहोचलेला चेहरा आहे. कित्येक आंदोलन, आमरण उपोषण, रास्ता रोको करत थेट मुंबई गाठून आरक्षण त्यांनी पदरात पाडून घेतलं. मात्र, याच धाडसी योध्दाला म्हणजे मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्यासाठी तब्बल २ कोटी रुपयांची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी जालना स्थानिक गुन्हे शाखेनं बीड जिल्ह्यातील दोघांना ताब्यात घेतलं असून, त्यांची नावं अमोल खुणे आणि दादा गरुड अशी आहेत. विशेष म्हणजे, ताब्यात घेतलेला अमोल खुणे हा मनोज जरांगे पाटील यांचा जुना सहकारी असल्याचं समोर आलं आहे.यासंदर्भात प्रसार माध्यमांच्या कॅमेरासमोर न येता जालना पोलिसांनी माहिती दिली आहे की, प्राथमिक चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, परळीतील एका नेत्याने काही कोटी रुपयांची ऑफर देत जरांगे यांच्या हत्येचा कट रचल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या दोघांची कसून चौकशी सुरू आहे. गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात आणि म राठा आंदोलनाच्या कार्यकर्त्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

## दारु ढोसताना मित्रांना शिवीगाळ, संतापात बिअरच्या बॉटलने मारहाण

**मुंबई :** तुर्भे नाका परिसरात सोमवारी ३ नोव्हेंबर रोजी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेत दारू पाजली नाही म्हणून मित्रांम ध्ये झालेल्या किरकोळ वादाने एका ४३ वर्षीय व्यक्तीचा जीव घेतला. ठाणे-बेलापूर मार्गावरील ओव्हरब्रिजखालील या घटनेनं संपूर्ण परिसर हादरला आहे. मृत व्यक्तीचं नाव पंडित उर्फ आनंद राम सहाय कोरी (वय ३९, रा. तुर्भे नाका, नवी मुंबई) असं आहे.

घटनेच्या रात्री सव्वादहाच्या सुमारास पंडित आपल्या तीन मित्रांसोबत तुर्भे नाका येथील ओव्हरब्रिजखाली बसून दारूचा आस्वाद घेत होता. दारूच्या नशेत असताना पंडितने साथीदारांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावरून झालेला वाद काही क्षणांतच गंभीर स्वरूपात बदलला. रागाच्या भरात अरुणकुमार भानु राजभर उर्फ आर्यन उर्फ दिपु (वय २०) याने फायबर पाईप आणि बिअरच्या बाटलीने पंडितवर तुफान हल्ला चढवला. मारहाण झाल्याने पंडित जागेवरच कोसळला. त्यानंतर आरोपी आणि त्याचे साथीदार घटनास्थळावरून फरार झाले.घटनेची माहिती मिळताच तुर्भे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या पंडितला जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. तुर्भे पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत आर्यन उर्फ अरुणकुमार भानु राजभर याला अटक केली असून, चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे.या प्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ७२६/२०२५ भा.दं. वि. कलम १०३ (१), ३(५) अंतर्गत नोंदविण्यात आला आहे.


## नाईट शिफ्ट संपली, घरी जात असताना अचानक दुर्घटना..



**रायगड :** महाड एमआयडीसीत काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नाईट शिफ्ट संपवून घरी परतणाऱ्या एका कामगार दुचाकी अपघातात गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी पहाटे पोलादपूर तालुक्यातील पार्ले गावाजवळ घडली. या अपघातात तुषार पवार (वय २८, रा. महाड परिसर) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने पनवेल येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. ही भीषण घटना श्री देव धाबा, पार्ले स्मशानभूमीजवळ पहाटे साडेचारच्या सुमारास घडली. तुषार पवार हे महाड एमआयडीसी येथील एका कंपनीत काम करतात. रविवारी रात्री त्यांनी नाईट शिफ्ट पूर्ण केली आणि आपल्या दुचाकीवरून घरी परतत होते. मात्र पार्ले गावच्या हद्दीत त्यांच्या दुचाकीवरचा ताबा सुटला आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला त्यांच्या वाहनाची जोरदार धडक बसली. धडकेत दुचाकीचा चक्काचूर झाला तर तुषार गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. स्थानिक युवकांनी जखमी तुषारला प्राथमिक उपचारानंतर महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथून त्यांना पुढील उपचारासाठी पनवेल येथे हलवण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. दर काही दिवसांनी अशा अपघातांच्या बातम्या समोर येत आहेत.कामगार संघटनांनी यापूर्वीच प्रशासनाकडे ङ्कमहाड ते पोलादपूरङ्क या मार्गावर एमआयडीसी कामगारांसाठी शिफ्टनुसार बससेवा सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र अद्यापही ती मागणी रखडलेली असल्याने कामगारांचा जीव रोज धोक्यात आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मिलिंद कोरे म्हणाले की, कामगारांचे प्राण रोज या रस्त्यावर धोक्यात आहेत. प्रशासनाने फक्त अपघातानंतर कारवाईची भाषा बोलण्याऐवजी, आधीच प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात. गेल्या सहा महिन्यांत महाड-पोलादपूर मार्गावर २४ पेक्षा जास्त अपघात घडले असून, यातील बऱ्याच घटना कामगारांशी संबंधित आहेत.

## नर्सने मुद्दाम ३७ रुग्णांना चुकीचं इंजेक्शन दिलं, १० जणांचा मृत्यू



**मुंबई :** आजारी लोक आपली तब्येत बरी व्हावी यासाठी रुग्णालयात जातात. रुग्णालयाकडे लोक मोठ्या आशेने पाहतात की तिथे जाऊन आपला आजार बरा होईल, आपला जीव वाचेल. पण, त्याच रुग्णालयाने जर जाणूनबुजून तुमचा जीव घेतला तर काय होईल. याचा विचार केल्यानेही अंगाचा थरकाप उडतो. रुग्णालय, डॉक्टर आणि वैद्यकीय व्यावसायिकांवर आपण इतका विश्वास ठेवतो की अशी कुठली कल्पनाही आपण करू शकत नाही. पण, जर्मनीमध्ये अलिकडेच झालेल्या एका घटनेने लोकांमध्ये मोठी भीती पसरली आहे.

पश्चिम जर्मनीतील एका न्यायालयाने एका परिचारिकेला १० रुग्णांची हत्या आणि २७ रुग्णांची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या परिचारिकेचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. या व्यक्तीवर वृद्ध रुग्णांना मॉर्फिन किंवा त्याप्रकारचे इंजेक्शन दिल्याचा आरोप होता. या परिचारिकेने आपल्या रात्रीपाळीवेळी कामाचा ताण कमी करण्यासाठी हे कृत्य केल्याची माहिती आहे. त्याप्रकरणी तिला दोषी ठ

ठरवण्यात आलं आहे. डिसेंबर २०२३ ते मे २०२४ दरम्यान पश्चिम जर्मन शहरातील वुर्सेलन येथील एका रुग्णालयात हे हत्याकांड घडल्याची माहिती आहे.याप्रकरणी, सरकारी वकिलांनी आचेन कोर्टात युक्तीवादावेळी सांगितलं की, त्या परिचारिकेने रुग्णांबद्दल कोणतीही सहानुभूती दाखवली नाही आणि जणू काही तोच त्यांच्या जीवनाचा अंतिम निर्णय घेणारा आहे, असं त्यांच्याशी वागला. तो चिडचिडा झाला होता आणि आपला राग काढण्यासाठी त्याने रुग्णांचे जीव घेतले.एएफपीच्या मते, समोर आलेल्या प्रकरणांपैकी अधिक रुग्णांचे बळी त्याने घेतलेले असू शकतात, हा आकडा आणखी मोठा असू शकतो. त्याने आतापर्यंत ३७ रुग्णांचे जीवन धोक्यात आणल्याची माहिती समोर आली आहे, त्यापैकी १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली आहे.

तो तिथे काम करत असताना उपचार घेतलेल्या इतर रुग्णांचीही चौकशी केली जात आहे. जर हे खरे ठरले तर त्या व्यक्तीला दुसऱ्या खटल्याला साम ोरे जावे लागू शकते.या परिचारिकेने २००७ मध्ये नर्सिंगचं प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर या २०२० मध्ये वुर्सेलन फॅसिलिटीमध्ये काम करण्यास सुरुवात केली. २०२४ मध्ये त्याला अटक करण्यात आली. शिक्षा सुनावताना न्यायालयाने त्याचा गुन्हा खूप गंभीर असल्याचे नमूद केलं. मात्र, दोषी व्यक्तीला अजूनही अपील करण्याचा अधिकार आहे.

# स्टार महिला क्रिकेटपटूने सिलेक्टरवर केला लैंगिक अत्याचाराचा आरोप

**मुंबई :** नुकताच महिला विश्वचषक २०२५ पार पडला. या स्पर्धेत भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा फायनल सामना जिंकला आणि पहिली विश्वचषकाची ट्रॉफी जिंकली. भारताने पहिली ट्रॉफी जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. पण आता महिला क्रिकेट रोज नव नवीन विक्रम करत असताना एक वाईट बातमी समोर आली आहे. महिला क्रिकेटपटूने आता एक गंभीर आरोप केला आहे.बांगलादेश महिला संघाच्या माजी कर्णधाराने माजी मुख्य निवडकर्त्यावर खळबळजनक आरोप केले आहेत. माजी कर्णधाराने एका मुलाखतीदरम्यान हे खुलासे केले. तिने बांगलादेश महिला क्रिकेट व्यवस्थेतील दीर्घकालीन समस्यांबद्दल सांगितले, 'ज्यात व्यापक भेदभाव, दुर्लक्ष आणि त्रासदायक अंतर्गत राजकारण यांचा समावेश आहे.

'बांगलादेश महिला क्रिकेट संघाची वेगवान गोलंदाज जहानारा आलमने माजी निवड समिती सदस्य आणि माजी क्रिकेटपटू मंजुरुल इस्लाम यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. मानसिक आरोग्याच्या कारणास्तव सध्या संघाबाहेर असलेल्या जहानारा यांनी २०२२ च्या महिला एकदिवसीय विश्वचषकादरम्यान राष्ट्रीय संघ व्यवस्थापनाकडून तिला अश्लील सल्ला मिळाल्याचे उघड केले.

तिने असेही म्हटले आहे की मंजुरुल इस्लामने या प्रस्तावांना नकार दिल्यानंतर तिने तिच्या कारकिर्दीत अडथळा आणण्यास सुरुवात केली. यापूर्वी, जहानारा यांनी बांगलादेश महिला संघाची कर्णधार निगार सुलताना यांच्यावरही हल्ल्याचे गंभीर आरोप केले होते. जहानारा यांनी बांगलादेशी पत्रकार रियासत अझीम यांच्या यूट्यूब चॅनेलवरील मुलाखतीत म्हटले आहे की, 'मला अनेक वेळा अश्लील सल्ला मिळाला, फक्त एकदाच नाही. जेव्हा तुम्ही एखाद्या संघाशी संबंधित असता तेव्हा तुम्ही अनेक गोष्टी बोलू शकत नाही. जेव्हा तुमची उपजीविका त्यावर अवलंबून असते तेव्हा बोलणे कठीण असते.

मी वारंवार बांगलादेश क्रिकेट बोर्डच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मदत मागितली, परंतु कोणीही कारवाई केली नाही.'जहानाराने सांगितले की तिने बीसीबीचे सीईओ नजमुद्दीन चौधरी आणि महिला समिती प्रमुख नादेला चौधरी यांच्याकडे वारंवार तक्रार



केली, परंतु कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. जहानाराने स्पष्ट केले की, '२०२१ मध्ये तोहिद भाईनी बाबू भाईमार्फत माझ्याशी संपर्क साधला. मला तोहिद सरांची काळजी घेण्यास सांगण्यात आले.' मी उत्तर दिले, 'ते प्रभारी आहेत, मी काय करू शकते? मी जाणूनबुजून अज्ञानी वागण्याचा प्रयत्न केला जेणेकरून त्यांना समजेल की मी अशा ऑफर स्वीकारणार नाही. त्यानंतर मंजू भाईनी माझ्याशी गैरवर्तन करण्यास सुरुवात केली.जहानाराने उघड केले की मंजुरुल इस्लामला महिलांशी अनुचितपणे जवळीक साधण्याची सवय होती. ती म्हणाली, 'प्री-कॅम्प दरम्यान, जेव्हा मी गोलंदाजी करत होते, तेव्हा तो येऊन माझ्या खांद्यावर हात ठेवायचा. तो अनेकदा खेळाडूंना त्याच्याकडे ओढायचा, त्यांना मिठी म ारायचा आणि त्यांच्या कानाशी बोलायचा. आम्ही आमचे अंतर राखत होतो. सामन्यांनंतर हस्तांदोलन देखील दूरवरून केले जायचे जेणेकरून तो जवळ येऊ नये.'

जहानाराने सर्वात धक्कादायक खुलासा केला जेव्हा तिने उघड केले की मंजुरुल इस्लामने तिला तिच्या मासिक पाळीबद्दल वैयक्तिक प्रश्न विचारले. ती म्हणाली, 'एकदा, तो माझ्याकडे आला, माझा हात धरला आणि विचारले, 'तुझी मासिक पाळी किती दिवसांपासून आहे?' पाच दिवस? पण ती कालच संपायला हवी होती. हा कालावधी संपला की मला सांग. मला स्वतःलाही पहायचे आहे.' मी फक्त गप्प राहिले आणि म्हणाले, 'भाऊ, मला समजत नाही.'' ते म्हणाले की फिजिओ आरोग्याच्या कारणास्तव खेळाडूंच्या मासिक पाळीबद्दल माहिती ठेवतो, परंतु निवडकर्त्यांना हे जाणून घेण्याची आवश्यकता नव्हती.

## सूर्याला चमकावं लागेल अनब भारताला जिंकावं लागेल

**ब्रिस्बेन :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाचवा टी २० सामना शनिवारी रंगणार आहे. पण या सामन्यापूर्वी सूर्याला चमकावं आणि भारताला जिंकावं लागेल, असे म्हटले जात आहे. कारण पाचव्या सामन्यापूर्वी चाहत्यांची चिंता वाढलेली आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी २० सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यानंतर दुसऱ्या वनडेत सामन्यात ऑस्ट्रेलियाने विजय साकारला आणि त्यांनी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली होती. तिसऱ्या टी २० सामन्यात अखेर भारताला विजय मिळवता आला, मालिकेतील हा त्यांचा पहिला विजय होता. या विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली होती. चौथा टी २० सामना हा दोन्ही संघांसाठी महत्वाचा होता. कारण हा सामना जो जिंकेल त्यांना



आघाडी मिळता येणार होती. चौथा टी २० सामना भारताने जिंकला आणि त्यांना मालिकेत २-१ अशी आघाडी मिळवता आली. आता पाचवा सामना शनिवारी होणार आहे. पण या सामन्यापूर्वी सूर्याला सर्वात जास्त महत्व प्राप्त झाले आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघासाठी हा सामना महत्वाचा असणार आहे. कारण ऑस्ट्रेलियाने जर हा सामना जिंकला तर त्यांना मालिका पराभवाची नामुष्की टाळता येऊ शकते आणि मालिकेत २-२ अशी बरोबरी करता येऊ शकते.

## मोहम्मद शमीच्या अडचणी वाढणार; मिळाली नोटीस

**मुंबई :** क्रिकेटर मोहम्मद शमीची पत्नी हसीन जहाँ हिने पोटगी वाढवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकार आणि मोहम्मद शमीला नोटीस बजावून चार आठवड्यात उत्तर मागवले आहे. कोलकत्ता उच्च न्यायालयाने हसीन जहाँला दीड लाख रुपये आणि मुलीला अडीच लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. मात्र, हसीन जहाँने ही रक्कम अपुरी असल्याचे सांगत ती वाढवण्याची मागणी केली आहे.

हसीन जहाँनेसर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत दरमहा पत्नीला ७ लाख रुपये आणि अल्पवयीन मुलीला ३ लाख रुपये पोटगी देण्याची मागणी केली आहे. मोहम्मद शमी आणि हसीन जहाँ यांनी २०१४ मध्ये लग्न केले होते. हसीन जहाँने शमीसह त्याच्या घरच्यांवर घरगुती हिंसाचाराचे आरोप करत त्याच्यापासून वेगळे राहण्यास सुरुवात केली. त्यांना एक मुलगी देखील आहे. हसीन जहाँने जुलै महिन्यात शमीवर तिला बदनाम करण्याचा करण्याचा आरोप केला होता. तिने एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये शमीला 'चरित्रहीन, लालची आणि मतलबी' म्हटले होते.माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत आमचं नातं मजबूत राहिल, सात वर्षापर्यंत आम्ही कायदेशीर लढाई लढत आहोत. चरित्रहीन, लालची आणि मतलबी असल्यामुळे कुटुंबाला उद्ध्वस्त केले. तू पुरुषप्रधान समाजाचा फायदा घेतला,



तर असामाजिक लोकांनी मला चुकीचे म्हटले. आता मी कायद्याची मदत घेईन, माझ्या सर्व हक्कांचा दावा करेन आणि आनंदाने राहीन. आता तू विचार कर, कोणता आधार जास्त मजबूत आहे सामाजिक की कायदेशीर? ज्या दिवशी तुझा वाईट काळ सुरू होईल, हेच लोक तुझी आयुष्य नरकासारखं करतील, असं हसीन जहाँ म्हणाली होती.या याचिकेत हसीन जहाँने दरमहा पत्नी म्हणून स्वतःसाठी ७ लाख रुपये आणि मुलगी म्हणून ३ लाख रुपये पोटगी म्हणून मागितले आहेत. ही मागणी कोलकत्ता उच्च न्यायालयाने दिलेल्या दीड लाख रुपये आणि अडीच लाख रुपयांपेक्षा खूप जास्त आहे. त्यामुळे या मागणीवर काय निर्णय होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## २.५ कोटी कॅश, ९००० स्वेअर फूटचं घर आणि क्लास वन नोकरी

**नवी मुंबई :** भारताच्या महिला संघाने इतिहास रचला. कारण भारताच्या महिला संघाने प्रथमच वर्ल्ड कप जिंकला. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भारतीय संघावर पैशांचा वर्षाव झाला. बीसीसीआयने ५१ कोटी रुपये दिले, तर आयसीसीने ४० कोटी रुपये दिले. पण भारताच्या एका खेळाडूला तर आता बंपर लॉटरीच लागली आहे. कारण आता या खेळाडूला सरकारने अडीच कोटी रुपये रोख दिले आहेत, तर ९००० स्क्वेअर फूटाचे घर दिले आहे, त्याचबरोबर क्लास वन सरकारी नोकरीही दिली आहे. त्यामुळे भारतामधील सर्वात मालामाल ही खेळाडू ठरली आहे.

भारताने वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये जिथे ऑस्ट्रेलियाला पराभूत केले तिथेच खेळाडूंनी सर्वांची मनं जिंकली होती. जेमिमा रॉड्रीग्जने नाबाद शतक झळकावले आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यानंतर भारत फायनलमध्ये पोहोचला. भारताचा फायनलमध्ये सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार होता. यापूर्वी दक्षिण आफ्रिकेने भारताला वर्ल्ड कपच्या साखळी फेरीत पराभूत केले होते. पण अंतिम फेरीत भारतीय संघाने त्या पराभवाचा वचपा काढला आणि वर्ल्ड कप जिंकला. या वर्ल्ड कप विजयानंतर वर्ल्ड कप संघांतील खेळाडूंवर पैशांचा वर्षाव होत आहे. पण भारताची एक खेळाडू तर चांगलीच नशिबवान ठरली आहे. कारण या



खेळाडूला आता राज्य सरकारने चांगलेच मालामाल केले आहे.आंध्र प्रदेशचे सरकार कधीही खेळाडूंचा सन्मान करण्यासाठी सरसावलेले असते. आता महिलांच्या वर्ल्ड कपनंतरही आंध्र प्रदेशच्या सरकारने आपला खेळाडूला चांगलेच मालामाल केले आहे. आंध्रप्रदेश सरकारने अडीच कोटी रोख, ९००० हजार स्केअरफूटचे घर आणि क्लास वन पदाची सरकारी नोकरी भारताच्या वर्ल्ड कप संघातील श्री चरणी या खेळाडूला दिला आहे. भारतीय या वर्ल्ड कपमध्ये अडचणीत सापडला होता, त्यावेळी श्री चरणीने संघाला विकेट्स मिळवून देण्याची महत्वाची भूमि का बजावली होती. त्यामुळे भारताच्या या विजयातही तिचा मोलाचा वाटा होता. त्यामुळे आता वर्ल्ड कप जिंकल्यावर तिला राज्य सरकारने चांगलेच बक्षिस दिले आहे.वर्ल्ड कप जिंकल्यावर आता भारतीय संघातील श्री चरणीला राज्य सरकारने चांगलेच मालामाल केल्याचे समोर आले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विकी कौशल झाला बाबा; कॅटरीनाने दिला मुलाला जन्म



**मुंबई :** ब्लेस्ड अशी कॅप्शन लिहित अभिनेता विकी कौशलने फॅन्ससाठी आनंदाची गोष्टशेअर केलीय. इन्स्टाग्रामवर त्याने आपण बाबा झाल्याचे वृत्त शेअर केले आहे. कॅटरीनाने गोंडस मुलाला जन्म दिला आहे. तशी कॅप्शन विकीने सुंदर पोस्टरसहित इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केलीय.

बॉलीवूडमधील सर्वाधिक चर्चेत असलेलं जोडपं कॅटरीना कैफ आणि विकी कौशल अखेर आई-बाबा झाले आहेत. दोघांच्या घरी चिमुकल्याचं आगमन झालं असून, या आनंदाच्या क्षणी चाहत्यांसह संपूर्ण फिल्म इंडस्ट्रीकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. कॅटरीना-विकीचं आयुष्य अधिक सुंदर बनलं असून, त्यांना एक 'आशिर्वादच' मिळाला आहे.

'आमचा आनंद आला आहे. अपार प्रेम आणि कृतज्ञतेने, आम्ही आमच्या बाळाचे स्वागत करतो. ७ नोव्हेंबर २०२५ .. कॅटरीना आणि विकी''

कॅटरीनाने मुंबईतील एका प्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये आज सकाळी गोंडस मुलाला जन्म दिला. कॅटरीना आणि विकीने ९ डिसेंबर २०२१ रोजी राजस्थानमधील सिक्स सेन्सेस फोर्ट बडवारा येथे अत्यंत गोपनीय विवाह सोहळा केला होता. लग्नानंतर दोघेही सतत सोशल मीडियावर एकत्र दिसत असले तरी, त्यांनी आपल्या खासगी आयुष्याबद्दल नेहमीच संयम पाळला आहे.

# रश्मिका-विजयच्या घरी सनई-चौघडे वाजणार! 'या' दिवशी करणार लग्न

**मुंबई :** अलीकडेच रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांच्या साखरपुड्याचे वृत्त समोर आले असताना आता त्यांच्या लग्नाचीही चर्चा सुरु झालीय. रिपोर्टनुसार, रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा २६ फेब्रुवारी २०२६ रोजी उदयपूरमध्ये लग्न करणार आहेत.

रश्मिका आणि विजय यांच्या साखरपुड्याच्या वृत्तानंतर लग्नाची चर्चा सुरु होती. दोघांच्याही हातात साखरपुड्याची अंगठी दिसली आहे. पण या सेलिब्रिटींकडून अधिकृतपणे घोषणा करण्यात आली नाही. रिपोर्टनुसार, टॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय कपलपैकी एक असलेल्या रश्मिका आणि विजय आतापासून चार महिन्यांत लग्न करणार आहेत. राजस्थानमधील उदयपूरमधील एका आलिशान वाड्यात हा लग्न सोहळा पार पडणार असल्याचे म्हटले जात आहे. हे एक डेस्टिनेशन वेडिंग असेल. लग्नाबाबत दोघांकडूनही अधिकृत माहिती मिळालेली नाही. पण त्यांच्या लग्नाच्या बातमीने फॅन्समध्ये आनंदाचे वातावरण आहे.

काही दिवसांपूर्वी दोघांच्या साखरपुड्याचे वृत्त येऊन धडकले होते. त्यावेळी त्यांनी अधिकृतपणे हा साखरपुड्याचा सोहळा पार पडल्याचे वृत्त जाहीर केले नाही. पण दोघांच्याही हातात साखरपुड्याची अंगठी दिसल्यानंतर त्यांचा साखरपुडा झाल्याचे कन्फर्म झाले.



दोन्ही सेलिब्रिटींच्या जवळच्या सूत्रांनी माध्यमांना माहिती दिली की, त्यांचा साखरपुडा ३ ऑक्टोबर २०२५ रोजी विजयच्या हैदराबाद येथील घरी झाला. या समारंभात जवळच्या नातेवाईक-मित्रमंडळींना बोलावल्याचे सांगण्यात आले.



दरम्यान, रश्मिकाचा 'थामा' चित्रपटाच्या प्रमोशनाच्या कार्यक्रमादरम्यान, रश्मिकाला विचारण्यात आले की, साखरपुड्याचे वृत्त सत्य आहे की अफवा? त्यावेळी रश्मिकाने लाजून उत्तर दिले, 'सर्वांना याबद्दल माहिती आहे.' यामुळे फॅन्स उत्साहित झाले. शिवाय आता रिपोर्टनुसार, विजयच्या जवळच्या सूत्रांनी खुलासा केला आहे की, हे दोघे पुढच्या वर्षी लग्न करण्याची योजना आहे. त्यामुळे फेब्रुवारीमध्ये दोघांच्या घरी सनई-चौघडे वाजण्याची शक्यता आहे.

# नव्या शोसह परतणार रोवन एटकिंसन

**मुंबई :** काहीच न बोलता स्वत:च्या अभिनयाने लोकांना हसवू शकणारे मोजकेच अभिनेते आहेत. अशाचपैकी एका अभिनेत्याला मिस्टर बीम या भूमिकेसाठी ओळखले जाते. हा अभिनेता आता एका नव्या शोसह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. प्रसिद्ध अभिनेता रोवन एटकिंसन हे नेटफ्लिक्सवर लवकरच कॉमेडी शो 'मॅन वर्सेस बेबी'सोबत परतणार आहेत.

ही सीरिज ११ डिसेंबर रोजी ओटीटीवर स्ट्रीम होणार आहे. सीरिजचे चार एपिसोड्स असणार आहेत. नेटफ्लिक्सने या सीरिजची घोषणा करत अनेक छायाचित्रे शेअर केली आहेत. या छायाचित्रांमध्ये रोवन एटकिंसन हे एका मुलासोबत दिसून येत आहेत. एका छायाचित्रात ते दोन मुलांसोबत असून त्यांना बाटलीने दूध पाजवत आहेत.



आणखी एका छायाचित्रात ते मुलासोबत एका शॉपिंग मॉलमध्ये आहेत. या शोमध्ये रोवन एटकिंसन एका महालाची देखभाल करणारी नोकरी सोडून एका शाळेच्या केयर टेकरची जबाबदारी सांभाळत असल्याचे दाखविण्यात येणार आहे. तेथे त्यांना मुलाची देखभाल करावी लागते. रोवन यांची ही विनोदी धाटणीची सीरिज २०२२ मधील प्रसिद्ध सीरिज 'मॅन वर्सेस बी'चे पुढील स्वरुप आहे.

# बॉलिवूड अभिनेत्री संध्या मृदुल ला हवीय मदत

**पटणा :** बॉलिवूड आणि टीव्ही जगतातील कलाकारांकडे काम नसल्याचे वृत्त अनेकदा समोर येत असते. मनोरंजनाच्या क्षेत्रात कधी कोण राजा ते रंक आणि रंक ते राजा होईल काही सांगता येत नाही. आता एका प्रख्यात अभिनेत्रीने काम नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे. मला काम मिळवून द्यावे, अशी विनंती तिने सोशल मीडियाच्या माध्यमातून केली आहे. या अभिनेत्रीचे नाव संध्या मृदुल असून तिने अनेक दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. पेज ३ आणि हनीमुन ट्रॅव्हल्स प्रायव्हेट लिमिटेड यासारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम पेलेल्या संध्या मृदुलने सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. सध्या मी अत्यंत अवघड काळाला सामोरी जातेय. माझ्याकडे काम नाही तसेच पैसे देखील नाहीत. लोक सध्या सोशल मीडियाच्या फॉलोअर्सना अधिक महत्त्व देतात. फॉलोअर्स नसतील तर काम मिळत नाही.

परंतु कामच मिळाले नाही तर कुणाला प्रसिद्धी कशी मिळणार? मग फॉलोअर्स कुठून येणार? ही अत्यंत गोंधळाची स्थिती आहे. माझ्याकडे पूर्वी जे काम होते, ते देखील आता नाही. कारण माझ्याकडे अधिक फॉलोअर्स नाहीत. फॉलोअर्स नसल्याने काम मिळत नसल्याचे माझा मॅनेजर सांगतोय. याचमुळे मदत करा अशी विनंती करत असल्याचे संध्याने म्हटले आहे.



# विजयच्या जन नायकनचा नवा लूक व्हायरल



**मुंबई :** थलपति विजयचा चित्रपट 'जन नायकन'च्या निर्मात्यांनी पोंगलच्या निमित्ताने एक नवे पोस्टर जारी केले आहे. ९ जानेवारी रोजी रिलीजच्या पहिल्या प्रचारासोबतच हे एक नवे पोस्टर जारी करण्यात आले असून ट्विटरवर व्हायरल होत आहे. टीव्हीके द्वारा २०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी विजयच्या मुख्यमंत्री उमेदवारीची अधिकृत घोषणाही करण्यात आलीय.


थलपति विजयचा आगामी चित्रपट 'जन नायकन'चे एक नवे पोस्टर निर्मात्यांनी एक्स अकाऊंटवर जारी केलं आणि लिहिलं-'चला सुरूवात करुया.' यामध्ये विजयला जनतेच्या नेत्याच्या रूपात दाखवण्यात आलंय. निळा शर्ट-एविएटर चश्मा घालून गर्दीत उभा असलेला तो दिसतो आहे. 'जन नायकन' ९ जानेवारी रोजी पोंगल/मंगल संक्रांतीच्या निमित्ताने रिलीज होईल. हा चित्रपट विजय राजकारणात उतरण्यापूर्वीचा अखेरचा चित्रपट मानला जात आहे. पोंगलचा उत्सव दक्षिण भारतात प्रेक्षकांसाठी खूप खास असतो. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर चांगले यश मिळू शकेल, असे म्हटले जात आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयात वंदे मातरम राष्ट्रीय गीताचे सामुहिक गायन



जनसंचलन/बुलढाणा

प्रसिध्द लेखक व कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित देशाचे राष्ट्रीय गीत ङ्गवंदे मातरम्फ या गीताला आज १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा माहिती कार्यालयात वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. यावेळी प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, वरिष्ठ लिपीक प्रतीक फुलाडी, श्रेया दाभाडकर, दप्तरी रामकुमार पाटील व वाहन चालक नामदेव घट्टे, कौशल्य विकास कार्यालयाचे वरिष्ठ लिपीक सचिन पवार, शुभम पवार उपस्थित होते.




# नगरपरिषद निवडणुकीसाठी सूक्ष्म नियोजन करा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला निवडणूक तयारीचा आढावा....

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील ११ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या असून या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी निवडणूक पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करुन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले. या आढावा बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार, जिल्हा सह आयुक्त पेंटे आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी आदर्श आचारसंहिता, प्रतिबंधात्मक आदेश, मनुष्यबळाचे व्यवस्थापन, मतदान आणि मतमोजणी विषयक तयारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या,



विविध भरारी पथकांच्या नियुक्त्या, मतदान केंद्रांवरील सोयीसुविधा, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट वाटपाचे व्यवस्थापन, मतमोजणी केंद्रावरील सोयीसुविधा, कायदा व सुव्यवस्था, विविध समित्यांच्या नेमणुका आदी विषयांचा आढावा घेवून सविस्तर चर्चा करण्यात आली. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने यंत्रणा सज्ज ठेवावे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे प्रतिबंधात्मक आदेश जारी करावे. मतदान केंद्रांवरील सोयीसुविधांची खात्री करावी. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्या. प्रचाराला सुरवात होण्यापूर्वी विविध भरारी पथके कार्यान्वित करावी. नियंत्रण कक्ष स्थापन करुन मतदारांसाठी मदत क्रमांक जारी करावे. नगरपरिषद निवडणुकांसह जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी या बैठकीत दिले.

# कुष्ठरोग शोध अभियानाला १७ नोव्हेंबर पासून सुरुवात...

जनसंचलन/बुलढाणा

आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) सहसंचालक यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान २०२५ ला सुरुवात होत आहे. ही मोहिम १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभर राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचा प्रमुख उद्देश सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरोग प्रसारफ्र हे शासनाने निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करणे हा आहे. समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरित आणि योग्य उपचार मिळावेत, तसेच कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर व्हावेत, यासाठी ही व्यापक मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत आशा कार्यकर्त्या व पुरुष स्वयंसेवकांची विशेष पथके गावोगावी, घराघरात जावून सर्वेक्षण करणार आहेत. संशयित रुग्णांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांना उपचारासाठी आरोग्य सेवेशी जोडले जाणार आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे.



त्यामुळे समाजातील नागरिकांनी कुष्ठरोगाबद्दल भीती बाळगू नये. संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित आरोग्य कर्मचाऱ्यांशी तसेच अधिक माहितीसाठी सहायक संचालक, आरोग्य सुविधा (कुष्ठरोग), बुलढाणा किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

# सैनिक कल्याण विभागात लिपीक टंकलेखकांची भरती

जनसंचलन/ बुलढाणा

सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपीक टंकलेखक (गट क) एकूण ७२ पदांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतीम मुदत ५ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली होती. आता अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून इच्छूक उमेदवार २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी २३.५९ वाजेपर्यंत अर्ज करु शकणार आहेत. इच्छूक उमेदवारांनी विहीत मुदतीत mahasainik.maharashtra.gov.in / https://mahasainik.maharashtra.gov.in/v2/register या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.



# लक्ष्मीभेट महागात पडली!

## बुलढाण्यात लाचखोर ग्रामसेवक अँटी करप्शन च्या जाळ्यात!

जनसंचलन/बुलढाणा

लक्ष्मीभेट स्वीकारण्याची लालसा दिवसागणिक वाढत असून,आज एका बुलढाण्यातील ग्रामसेवकाला २० हजारांची लाच घेतांना अँटी करप्शन पथकाने रंगेहात पकडले आहे. राजेंद्र वास्कर रा. दाभा ता. मोताळा,असे लाच घेणाऱ्याचे नाव आहे. प्राप्त माहिती नुसार, राजेंद्र रघुनाथ वास्कर, (वय ५० वर्ष) पद ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) रा. ग्रामपंचायत दाभा ता. मोताळा, वर्ग-३ रा. जिजाऊ कॉलनी, हाजी मलंग दर्गाच्या पाठीमागे, ता. जि. बुलढाणा याने बुलढाणा तहसिल कार्यालय आवारामध्ये ७ नोव्हेंबर रोजी तक्रारदार यांची व त्यांचे मयत बहीण, भाऊ यांची ग्राम नाईकनगर ग्रामपंचायत दाभा येथे असलेल्या दोन्ही जागा तकारदार यांचे दोन्ही मुलाच्या नावे करुन गाव नमुना ८-अ वर नोंद करुन ८ अ उतारा देण्यासाठी दोन्ही कामाचे मिळुन २८ हजार रूपये लोकसेवक राजेंद्र वास्कर, ग्रामसेवक हे लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागकाडे प्राप्त झाली होती. त्यानुसार आज ७ नोव्हेंबरला लाच मागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत करण्यात आली होती. त्यामध्ये लोकसेवक राजेंद्र वास्कर, ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे नमुना ८-अ मध्ये नाव नोंदविण्यासाठी व ८ अ उतारा देण्यासाठी तडजोडअंती २० हजार रुपये लाच मागणी करुन लाचेची रक्कम आजच घेवुन येण्यास




सांगीतल्या वरून आज रोजी तहसिल कार्यालय, बुलढाणा येथील आवारामध्ये सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडून २० हजार रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना राजेंद्र वास्कर यांना रंगेहात पकडण्यात आले. राजेंद्र वास्कर यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे

# दैनिक जनसंचलन सिटी न्यूज व हॅलो बुलढाणाच्या प्रकाशपर्व २०२५ या दिवाळी विशेष अंकाचे विमोचन सोहळा पाहुण्याच्या हस्ते..



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८